# शेतकरी, विक्रेत्यांसाठी 'फार्मर्सओआरजी प्लॅटफॉर्म'



नागपूर : भाज्या, फळे आणि डाळींच्या उपलब्धतेबद्दल व त्यांच्या किमतीविषयी माहिती देणारा तसेच शेतातून टेबलपर्यंत आणण्यासाठी पडणारा आर्थिक ताण कमी करणारा एक अनोखा डिजिटल प्लॅटफॉर्म पुणे येथील मायविश्व टेक्नॉलॉजिजतर्फे सादर करण्यात आला आहे. 'फार्मर्सओआरजी.इन' हा प्लॅटफॉर्म शेतकरी, ग्राहक, घाऊक व किरकोळ विक्रेत्यांना एकत्र आणेल. या प्लॅटफॉर्ममुळे शेतकऱ्यांची सोय होणार असून, त्यांना किरकोळ, घाऊक विक्रेते किंवा मोठ्या संस्था तसेच सोसायट्यांच्या गरज समजतील व ते त्याप्रमाणे प्रतिसाद देतील. प्लॅटफॉर्म पोर्टल तसेच ॲण्ड्राईड व आयओएस ॲपच्या रूपात उपलब्ध आहे. हा डिजिटल प्लॅटफॉर्म शेतकऱ्यांना त्यांच्या विक्री, योग्य वस्तूंची यादी संभाव्य ग्राहकांसाठी प्लॅटफॉर्मवर पोस्ट करण्यास मदत करेल. तसेच ग्राहकांनादेखील त्यांची खरेदीची यादी संभाव्य विक्रेत्यांसाठी पोस्ट करता येणार असल्याचे मायविश्व टेक्नॉलॉजिजचे संचालक मंदार जोगळेकर यांनी सांगितले.